# प्रेसनोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.२७/०८/२०२६

आलोसे उमेश सुभाष राठोड,वय–३१ वर्षे, पद– मंडळ कृषि अधिकारी,अतिरीक्त पदभार गुण नियंत्रण, अधिकारी, तालूका कृषि अधिकारी कार्यालय,मानोरा ता.मानोरा जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना त्यांचे कृषि केंद्राच्या दिलेल्या कारणे दाखवा नोटिस संबंधाने कारवाई न करण्याकरीता कृषि औषधी पुरवठा करणा–या कंपनीच्या बहाण्याने दि. १३/०८/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान४०,००० रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/– रुपये लाचेची स्पष्ट मागणी केली व स्विकारण्याचे मान्य केले. दि. २७/०८/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान २५,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | आलोसे उमेश सुभाष राठोड,वय–३१ वर्षे, पद– मंडळ कृषि अधिकारी,अतिरीक्त पदभार गुण नियंत्रण, अधिकारी, तालूका कृषि अधिकारी कार्यालय,मानोरा ता.मानोरा जि. वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | २५,०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना त्यांचे कृषि केंद्राच्या दिलेल्या कारणे दाखवा नोटिस संबंधाने कारवाई न करण्याकरीता ३०,००० रुपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान २५०००/– रुपये स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्रीमती अलका गायकवाड,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.१०/०८/२०२६ रोजी तक्रारदार पुरुष वय ३५ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार त्यांचे कृषि केंद्राच्या दिलेल्या कारणे दाखवा नोटिस संबंधाने कारवाई न करण्याकरीता गैरअर्जदार हे ४०,००० रुपये लाच मागणी करीत आहेत.

दि.१३/०८/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान उमेश राठोड यांनी ४०,००० रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/– रुपये लाचेची स्पष्ट मागणी केली व पुढील हत्प्यात स्विकारण्याचे मान्य केले. दि. २५/०८/२०२६ रोजी उमेश राठोड हे तक्रारदार यांना ग्राम ईंझोरी येथे भेटले त्यांचेत झालेल्या चर्चेदरम्यान उमेश राठोड यांनी २५,०००/– रु स्विकारण्याचे मान्य केले. दि. २७/०८/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोस उमेश राठोड यांनी तक्रारदार यांचेकडुन २५,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. आलोसे उमेश सुभाष राठोड,वय–३१ वर्षे, पद– मंडळ कृषि अधिकारी,अतिरीक्त पदभार गुण नियंत्रण, अधिकारी यांचे कडुन लाच रक्कम २५,०००/– रु हस्तगत केली. आलोसे यांचे विरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधिक्षक श्री सुनिल किनगे, ॲन्टीकरप्शन ब्युरो अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदिश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे मार्गदर्शनात तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीमती अल्का गायकवाड यांचे पथकातील कर्मचारी पोहवा योगेश खोटे, पो.कॉ.महेश परमेश्वरे, सतिश गुडदे, चापोशि नावेद शेख ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टीकरप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनीक्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक–८३२९०३३१७७ यावर संपर्क साधण्याचे आवाहन अल्का गायकवाड,पोलीस निरीक्षक ॲन्टीकरप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

A.M.Gaikwad

(अल्का गायकवाड)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.

पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
वाशिम